महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
ई. मेल :- cgmte@mahadiscom.in
फॅक्स नं. :- ०२२ -२६५८०६४२
वेबसाईट :- www.mahadiscom.in

मनुष्यबळ पुनर्विलोकन कक्ष
म.रा.वि.वि.कं.मर्यादित
प्रकाशगड, ४ था मजला
स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व)
मुंबई - ४०० ०५१

क्र.साप्रवि/मुमव्य (तां.आ.)/मपुक/20८४६ दिनांक : 02-07-2011

**कार्यालयीन आदेश क्र. मपुक - १९**

*प्रस्तावना:*

नागपूर परिमंडल या कार्यालयामध्ये पदस्थापित व कार्यरत असणा-या वेतनगट ३/४ मधील कर्मचा-यांची नागपूर ग्रामीण मंडलाकडे असलेल्या जेष्ठतेबाबतचे सुधारीत आदेश, आदेश क्र. ५२ (GAD/VII-B/ 27598) दि. १५/०९/२००४ अन्वये नागपूर ग्रामीण मंडल दि. १५/०९/२००४ पासून नागपूर शहर परिमंडलास जोडल्यानंतर देखील निर्गमित केलेले नसल्यामुळे या कर्मचा-यांची जेष्ठता अद्यापही नागपूर ग्रामीण मंडलाकडेच आहे. सदर बाबतीत सुधारीत आदेश देण्याविषयीची बाब महावितरण कंपनीच्या व्यवस्थापनाच्या विचाराधीन होती.

याबाबत सखोल विचारांती व्यवस्थापनाने असे ठरविले आहे की, नागपूर परिमंडल कार्यालयातील वेतनगट ३/४ मधील पदे भरण्याची व या पदावर कार्यरत असणा-या कर्मचा-यांची जेष्ठता राखण्याची जबाबदारी, जी सध्या नागपूर परिमंडलांतर्गत कार्यरत नसलेल्या नागपूर ग्रामीण मंडलाकडे आहे, ती त्यांच्याकडून काढून घेऊन वर्धा मंडलाकडे सोपवावी.

*आदेश*

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित कर्मचारी सेवाविनियम २००५ अनुसूची क्र. एक मधील अ. क्र. एच अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन व्यवस्थापकीय संचालक, मराविविकंम यांनी खालील बाबीस मंजूरी दिली आहे.

**"वेतन व भत्ते अदा करणे तसेच वेतनगट ३/४ मधील पदे भरणे याकरीता नागपूर ग्रामीण मंडलाकडे यापूर्वी जोडलेले नागपूर परिमंडल कार्यालय तेथून काढून वर्धा मंडलास जोडणे."**

सदर आदेश कंपनीच्या इन्ट्रानेटवर उपलब्ध असून याची हार्ड प्रत कोणत्याही कार्यालयास पाठविली जाणार नाही.

*मुख्य महा व्यवस्थापक (तां.आ.)*

F:\My documant\Office Order 2011 (Marathi).doc 30/06/2011